

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

महाशिवरात्री निमित्त सर्वांना शुभेच्छा

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## महाकुंभात झाले महारेकॉर्ड्स्...

### आजपर्यंत ६४ कोटी भाविकांचे संगमात स्नान, रचला जागतिक विक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६प्रयागराज**

आज महाकुंभाचा शेवटचा दिवस आहे. १३ जानेवारीपासून सुरू झालेल्या या महाकुंभात आतापर्यंत ६४ कोटी लोकांनी संगमात स्नान केले आहे. म्हणजेच अमेरिकेच्या लोकसंख्येच्या दुप्पट. हा एक जागतिक विक्रम आहे. हा एकमेव विक्रम नाही. या महाकुंभात आणखी अनेक महान विक्रम झाले.



महाकुंभ मेळ्यातील शेवटचा दिवस आणि महाशिवरात्री असा 'मुहूर्त' साधत मध्यरात्रीपासून भाविकांनी संगमावर स्नानासाठी गर्दी केली. पहाटे ४ वाजेपर्यंत सुमारे २५ लाख लोकांनी संगमावर स्नान केलं.

महाशिवरात्रीनिमित्त सुमारे २ ते ३ कोटी लोक स्नान करणार असल्याचा अंदाज आहे. अशा परिस्थितीत महाकुंभ मेळाव्यातील स्नानाचा आजपर्यंतचा आकडा ६७ ते ६८ कोटींच्या जवळपास पोहोचू शकतो. चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, याकरिता गर्दीवर नियंत्रण आणण्याचे प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात आले आहेत. २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजल्यापासून शहरात येणाऱ्या वाहनांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. सोमवारी १.३० कोटींहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केलं. मंगळवारीही १.११ कोटींहून अधिक लोक त्रिवेणी संगमावर पोहोचले होते. १३ जानेवारीपासून ६५ कोटी भाविकांनी महाकुंभ मेळाव्यात स्नान केलं आहे.

संगमावर पवित्र स्नानाकरिता जाण्याकरिता भाविकांची गर्दी होत आहे. पोलिस प्रशासनाकडून सर्व भाविकांना जवळ असलेल्या घाटांवर स्नान करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. दक्षिण झुंसीहून येणारे भाविक संगम द्वार ऐरावत घाटावर स्नान करू शकतात. तर उत्तर झुंसीहून येणारे भाविक संगम हरिश्चंद्र घाट आणि संगम जुना जीटी घाट येथे स्नान करू शकतात. तसेच, संगम द्वार भारद्वाज घाट, संगम द्वार नागवासुकी घाट, संगम द्वार मोरी घाट, संगम द्वार काली घाट, संगम द्वार राम घाट आणि संगम द्वार हनुमान घाट येथे भाविकांनीस्नान केले.

**नियंत्रण कक्षातून मुख्यमंत्र्यांची देखरेख**

महाकुंभ मेळ्यातील शेवटच्या स्नानासाठी प्रशासनानं कडेकोट व्यवस्था केली आहे. मुख्यमंत्री योगी यांनी गोरखनाथ मंदिरातील नियंत्रण कक्षातून महाशिवरात्रीच्या पवित्र स्नानावर देखरेख ठेवली आहे. जिल्हा दंडाधिकारी रवींद्र कुमार मांधड यांच्या माहितीनुसार रेल्वे, विमानतळ, खासगी वाहने तसेच रस्ते मार्गानं मोठ्या संख्येनं भाविक संगम शहरात पोहोचले होते.

## 'मातोश्री'वर जाणाऱ्या साड्या परफ्यूम, एसी, पेट्रोलही नेत्यांचे

### मंत्री नितेश राणेंनी सर्वच काढले; एकनाथ शिंदेंनीही बिले भरल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**

उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री या निवासस्थानी जाणाऱ्या साड्या, परफ्यूम, एसी, पेट्रोलही उमेदवारांकडून दिले जाते. ज्यांना शिवसेनेचा इतिहास माहिती आहे. अशा सर्वांना हे सत्य माहिती असल्याचा आरोप भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी नीलम गोऱ्हे यांची पाठराखण करायला हवी, असेही राणे यांनी म्हटले आहे. नीलम गोऱ्हे जे बोलल्या ते सत्य होते. त्यामुळेच मातोश्रीवरील वहिनींना ते झोंबले असा आरोपही त्यांनी केला.



शिवसेनेचा इतिहास ज्यांना – ज्यांना माहिती आहे. त्यात नारायण राणे असतील किंवा एकनाथ शिंदे असतील. जे जुने शिवसैनिक आहेत. त्या प्रत्येकाला नीलम गोऱ्हे जे बोलल्या, ते सत्य असल्याचे माहिती आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी गोऱ्हे यांची पाठराखण करायलाच हवी. इतकेच नाही तर उद्धव ठाकरे यांची असंख्य बिले ही एकनाथ शिंदे यांनी देखील भरलेली असल्याचा दावा मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या घरी जाणाऱ्या साड्या, परफ्यूम, गाडीचे पेट्रोल, खासगी विमानाचे बिल तसेच घरातील एसी देखील त्यांचा नाही. हे सर्व आम्हाला माहिती आहे. त्यामुळे कधीतरी त्यांनी खुल्या रंगमंचावर येऊन चर्चा करावी, अशी मागणी देखील राणे यांनी केली आहे. हे सर्व आम्ही पुराव्या सगट द्यायला तयार आहोत. नीलम गोऱ्हे या काहीच वाईट बोलल्या नाहीत. मात्र, मातोश्रीच्या वहिनींना ते सत्य असल्यामुळे झोंबले असल्याचे राणे यांनी म्हटले आहे.

## संतोष देशमुख प्रकरणी उज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६मुंबई**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर उज्वल निकम यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटलंय की, संतोष देशमुख हत्या प्रकरणात माझ्या नियुक्तीकरिता मस्साजोगचे ग्रामस्थ मागणी करत होते. त्यानंतर त्यांनी नियुक्तीकरिता कालपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केलेलं आहे. हे ऐकून मी व्यथित झालो होतो. त्यानंतर मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात काल कळवलं.

सदरचा खटला चालवण्यासाठी मी तयार आहे. त्यांनी त्याप्रमाणे खटला चालवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आदेश पारित केल्याचं आज मला समजलं आहे. अर्थात मी याकरिता मुख्यमंत्र्यांचा आभारी आहे. तसंच मस्साजोगच्या ग्रामस्थांनी उपोषण सोडावं असं आवाहन देखील ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांनी केलंय. ते म्हणाले की, याला कारण असं आहे की या देशात कायदा आणि न्याय सर्वोच्च आहे. आपल्या प्रकृतीला त्रास होईल, असं कृत्य करू नये. त्यामुळे आपण उपोषण सोडावं असं ते मस्साजोगचे ग्रामस्थ यांना उद्देशून म्हणाले आहेत.उज्वल निकम यांनी सांगितलंय की, आरोपपत्र दाखल झाल्यानंतर तातडीने खटला चालविण्यास घेऊ. माझ्या नियुक्तीचे राजकीय पडसाद उमटतील, अशी कल्पना होती. मुख्यमंत्र्यांना देखील सांगितलं होतं. त्यांनी सांगितलंय की, विरोधी पक्षाचे अनेक वकील राजकारणात सक्रीय होते अजूनही आहेत. निकम म्हणाले की, मी राजकारणात याआधी कधीही सक्रिय नव्हतो. मी अभिमानाने सांगेल की, राजकारणात असलो तरी माझ्या कर्तव्यात कोणीही आडवं येऊ शकत नाही. त्याच जोमाने मी खटला चालवणार आहे. विरोधकांच्या गाऱ्हाण्याला मी काहीही महत्त्व देत नाही. नुसता विरोधासाठी विरोध करणं, हा त्यांचा स्थायी स्वभाव आहे, अशी टीका उज्वल निकम यांनी केलीय.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात राज्य सरकारने मोठा निर्णय घेतलाय. महाराष्ट्र सरकारतर्फे ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची सहाय्यक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आलीय. ही माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## त्र्यंबकेश्वर मंदिराच्या प्रांगणात नृत्य करणार नाही! प्राजक्ता माळीचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६त्र्यंबकेश्वर**

आज महाशिवरात्रीनिमित्त नाशिकच्या त्र्यंबकेश्वरमंदिराच्या प्रांगणात आयोजित शिवार्णमस्तु कार्यक्रमाला उपस्थित राहणार होती. तसंच ती तिथे शिवस्तुतीच्या दोन रचनाही सादर करणार होती. प्राजक्ता स्वत: कथ्थक नृत्यात पारंगत असल्याने तिला देवस्थाननेच आमंत्रित केलं होतं. मात्र माजी विश्वस्तांनी काल याविरोधात तक्रार केली होती. यावर प्राजक्ताने आपण कार्यक्रमाला जाणार असल्याचं स्पष्ट केलं होतं. मात्र आज तिने कार्यक्रमाला न जाण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच यामागचं कारणही सांगितलं आहे.




प्राजक्ता माळीने इन्स्टाग्राम स्टोरीवर व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये ती म्हणते, सर्वांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा. आज त्र्यंबकेश्वरमंदिराच्या प्रांगणात शिवार्पणमस्तु कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे . पहिल्यापासूनच या कार्यक्रमाला फार प्रसिद्धी द्यायची नाही असं ठरलं होतं. कारण मंदिराचं प्रांगणं, क्षेत्रफळ, तिथे किती माणसं कार्यक्रम पाहण्यासाठी बसू शकतात या सगळ्या गोष्टींचा विचार करता मीही सोशल मीडियावर या कार्यक्रमाविषयी अजिबात माहिती दिली नव्हती. परंतू काल दिवसभरात या कार्यक्रमाला अनावश्यक प्रसिद्धी मिळाली आणि त्यामुळे आता अवास्तव गर्दीची भीती, काळजी प्रशासनाच्या मनात आहे. त्यामुळे मी कुटुंबियांशी बोलून निर्णय घेत आहे की कमिटमेंट आहे म्हणून कार्यक्रम होईल. माझे सहकलाकार माझ्याशिवाय कार्यक्रम सादर करतील.

ती पुढे म्हणाली, अर्थातच याने माझ्या आनंदावर विरजण पडणार आहे. परंतू वैयक्तिक सुखापेक्षा आपल्यामुळे प्रशासनावर अतिरिक्त ताण येऊ नये ही बाब मला जास्त मोठी आणि महत्वाची वाटते. त्यामुळे सर्वस्वी हा माझा निर्णय आहे. जिथे भाव असतो तिथे देव असतो यावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे मी कुठेही बसून शिवाची आराधना केली तरी शिवापर्यंत ती पोहोचणारच आहे. तिथे कोणाचाही हिरमोड होऊ नये, कोणाच्याही मनात कसलीही शंका येऊ नये म्हणून माहितीकरता मी हा व्हिडिओ बनवत आहे. हर हर महादेव.

## विद्येचं माहेरघर हादरलं; स्वारगेट स्थानकातील बसमध्येच तरुणीवर बलात्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६पुणे**

स्वारगेट बस स्थानकात २६ वर्षीय तरुणीवर बसमध्येच बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सोमवारी पहाटेच्या सुमारास हा संपूर्ण प्रकार घडला. एसटी बसमध्ये हा प्रकार घडल्यानं विद्येच्या माहेरघरात मोठी खळबळ उडाली. पोलिसांनी आरोपीची ओळख पटवली असून त्याच्या शोधासाठी ८ पथकं रवाना करण्यात आली आहेत.



एसटी बसमध्ये तरुणीवर बलात्कार : एक २६ वर्षीय तरुणी पुण्यावरुन फलटणला जाण्यासाठी बसस्थानकावर आली. यावेळी संशयित आरोपीनं तिला बस तिकडं लागली आहे, असं सांगून बसमध्ये नेलं. यावेळी नराधमानं बसमध्येत तिच्यावर बलात्कार केला. घटनेनंतर आरोपीनं घटनास्थळावरुन पोबारा केला. हादरलेल्या तरुणीनं आरडाओरडा केल्यानंतर ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीची ओळखही पटली असून आरोपीच्या शोधासाठी पोलिसांची आठ पथकं रवाना करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

## जिल्ह्यातील सर्वच शिव मंदिरात भक्तांची मांदियाळी : दर्शनासाठी लागल्या भाविकांच्या रांगाच रांगा : ठिकठिकाणी फराळाचे स्टॉल्स, फराळवाटप

### सालबर्डी, कोंडेश्वर, गडगडेश्वर, तपोवनेश्वरसह विविध मंदिरात भक्तांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण शहरात आज बुधवार २६ फेब्रुवारीला महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.. शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील विविध शिवालयांमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांच्या रांगाच रांगा लागलेल्या पहावयास मिळाल्या तर हर..हर...महादेव च्या गजराने संपूर्ण परिसर फुलून गेला होता.



संपूर्ण जिल्हाच 'हर.. हर.. महादेव'च्या गर्जनेने आज सकाळ पासूनच गरजलामहाशिवरात्रीसाठी शहरातील सर्वच शिवालये सजली होती अनेक ठिकाणी आकर्षक रोषणाई, सुरेख आरास देखिल करण्यात आली होती. कोंडेश्वर, गडगडेश्वर, तपोवनेश्वर, सालबर्डीसह विविध मंदिरे सज्ज असून या ठिकाणी यात्रा सुद्धा भरविण्यात आली आहे.

अमरावती शहरानजीक बडनेरा मार्गावर कोंडेश्वर हे पुरातन शिवमंदिर आहे. दर सोमवारी येथे शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होते. महाशिवरात्रीला तर येथे मोठा उत्सव असतो. जिल्ह्याच्याच नव्हे तर विदर्भाच्या काना कोपऱ्यातून भाविक येथे दर्शनासाठी येतात. महाशिवरात्रीनिमित्त येथे मोठी यात्रा भरते. कोंडेश्वर येथे यात्रेला सुरूवात झाली आहे.महाशिवरात्रीला बुधवारी पहाटेपासूनच येथे भक्तांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. त्याचप्रमाणे तपोवनेश्वर हे देखिल एक जागृत मंदिर आहे. येथे देखिल आज भक्तांनी प्रचंड गर्दी केली होती. त्यादृष्टीने जय्यत तयारी या मंदिरात करण्यात आली होती.यासह मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील सालबर्डी हे देखिल एक जागृत शिवमंदिर आहे. हे मंदिर जंगलात व व उंचावर असून येथील भुयारात आपोआप तयार झालेले शिवलिंग आहे. नैसर्गिक सुंदर वातावरणामुळे येथे पर्यटकांचा देखिल वर्षभर राबता असतो. सालबर्डीला छोटा महादेव असेही संबोधले जाते. सालबर्डी, तपोवनेश्वर, कोंडेश्वर साठी विशेष बसेस देखिल एसटी महामंडळाच्यावतीने सोडल्या जातात.शहरात जन्या टाकसाळ परिसरात जागृत भोलेश्वर मंदिर, साईनगरातील शिवालय, सालबर्डी, नांदगाव खंडेश्वर येथील खंडेश्वर शिवालय आदींसह विविध ठिकाणी शिव भक्तांची मांदियाळी पहावयास मिळाली.या जिल्ह्यातील सर्वच शिवालय भक्तांनी फुलून गेले होते.

## संपादकीय ......

# मर्सिडिज पुराण

मर्सिडिज ही महागडी गाडी आहे, एवढेच आपल्याला माहिती होते. कुठलीही जाहिरात न करता सध्या ही गाडी गाजत आहे. या गाडीचा उद्धार नुकताच दिल्लीमध्ये झालेल्या साहित्य संमेलनात करण्यात आला. प्रकट मुलाखतीमध्ये एका विदूषी भगिनींनी त्या आधी ज्या पक्षात होत्या त्या पक्षावर काही आरोप केले. राजकीय लोकांना व्यासपीठावर आणण्याची हौस साहित्यिक लोकांना जास्त असते की काय, अशी शंका वाटत आहे. आम्ही कसे घडलो, हे सांगण्यासाठी अनेक राजकीय लोक साहित्याच्या व्यासपीठावर आले. व्यासपीठावर आल्यानंतर राजकीय लोक काय बोलतील याला काही धरबंद नसतो. साहित्य संमेलनामध्ये 'आम्ही कसे घडलो' हे सांगण्यासाठी खरे तर साहित्यिक लोकांनाच बोलवायला पाहिजे होते; पण राजकीय लोकांसाठी संधी असावी म्हणून हे व्यासपीठ तयार केले गेले आणि त्यावर बरेच राजकीय नेते येऊन मुक्ताफळे उधळून गेले.

मर्सिडिज गाडीचा जो विषय आला तो ज्या राजकीय भगिनींनी मांडला त्या आरोपाने साहित्य संमेलनातच नव्हे, तर संपूर्ण राज्यात खळबळ उडवून दिली. तिकीट हे प्रकरण राजकारणामध्ये महत्त्वाचे असते. साधे नगरपालिकेचे पक्षाचे तिकीट पाहिजे असेल तरी मुंबईपर्यंत धडक मारावी लागते आणि मोठ्या नेत्यांचे उंबरठे झिजवावे लागतात. या भगिनींनी आपल्या आधीच्या पक्षावर असा आरोप केला की, दोन मर्सिडिज दिल्याशिवाय पक्षामध्ये कोणतेच पद मिळत नव्हते. याचा साधा सोपा अर्थ असा आहे की, ज्यांना पदे मिळाली आहेत त्यांनी किमान दोन मर्सिडिज पक्षप्रमुखांना दिलेल्या आहेत. आपल्यासारख्या सामान्य लोकांना मर्सिडिजची किंमत फारशी माहीत नसते. आपण फार तर मारुती वॅगनार किंवा आय टेन इत्यादी गाड्यांपर्यंतच झेप मारू शकतो. मर्सिडिज या गाडीची किंमत सध्या पन्नास ते साठ लाखांच्या आसपास आहे, असे आढळून येते. दोन मर्सिडिजचे मिळून एक कोटीपेक्षा जास्त रुपये होतात. मुंबईसारख्या ठिकाणी एखाद्या पक्षाच्या प्रमुखाच्या घरी जर एखाद्या दिवशी ३० लोक येत असतील आणि त्यापैकी दहा लोकांना पद मिळत असेल, तर त्यांच्या दारात २० मर्सिडिज उभ्या राहायला हव्यात. मोठ्या प्रमाणावर मर्सिडिज उभा राहण्याइतकी जागा मुंबईमध्ये मर्सिडिजच्या शोरूममध्येसुद्धा नसते. या राजकारणी भगिनीला दोन मर्सिडिज म्हणजे एक कोटी रुपयांपेक्षा जास्त असे अभिप्रेत असावे; अन्यथा चारचाकी गाडी घेऊन लोक येतील कसे आणि पक्षप्रमुख गाड्या ठेवतील तरी कुठे? हा प्रश्न उभा राहतो.यातून एक निश्चित झाले की, पक्षांमध्ये पद मिळण्यासाठी किंवा निवडणुकीचे तिकीट मिळण्यासाठी काही ना काही तरी खर्च निश्चितच करावा लागतो. तो करण्याची ज्याच्याकडे ताकद आहे तोच ते तिकीट किंवा ते पद मिळविण्यामध्ये यशस्वी होतो. राजकारण हा आता धनदांडग्यांचा खेळ झालेला आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्याला इथे करण्यासारखे काहीही उरलेले नाही. कधीकाळी कार्यकर्ते घरचा डबा सायकलला बांधून पक्षाच्या प्रचारावर जात असत, याचे कारण म्हणजे त्यांचा त्या पक्षाच्या विचारसरणीवर विश्वास असे. आता घरचा डबा कुणी नेतच नाही आणि राजकीय कार्यकर्ते तर कधीच सायकल वापरत नाहीत.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ३ मार्चला काँग्रेसचे राज्यभर आंदोलन : हर्षवर्धन सपकाळ





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६मुंबई –** भाजपाच्या राज्यात शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट असून शेतमालाला हमीभाव मिळत नाही. निवडणुकीच्या काळात भाजपा युतीने शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याची घोषणा केली परंतु अद्याप त्यावर निर्णय घेतला नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ३ मार्च रोजी काँग्रेस राज्यभर आंदोलन करणार आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील विकास कामे व जनतेची कामे ठप्प पडली आहेत, त्याविरोधात ४ मार्चला महापालिका क्षेत्रात आंदोलन केले जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

टिळक भवन येथे आज प्रदेश काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत जनतेला भेडसावणाऱ्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली तसेच या आंदोलनाची रुपरेषा ठरवण्यात आली. ८ व ९ मार्च रोजी बीड जिल्ह्यात सद्भावना पदयात्रा काढण्यात येत आहे, त्यासंदर्भात तसेच पक्ष संघटना बळकट करण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, उथउ सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, राज्यातील भाजपा युतीचे सरकार शेतकरी विरोधी व भांडवलदार धार्जिणे आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भावात ४ हजार रुपये क्विंटलने सोयाबीन विकावे लागत आहे. कांदा, हरभरा, कापूस या पिकांनाही भाव नाही. आता शेतकऱ्याची तूर बाजारात येत आहे, तर केंद्र सरकारने ऑस्ट्रेलियातून तूर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे, भाजपा सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्याच्या तुरीला भाव मिळणार नाही. शेतकऱ्यांच्या आजच्या स्थितीला सरकार जबाबदार आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष राज्यभरातील सर्व जिल्हा मुख्यालयी ३ मार्च रोजी राज्यभर आंदोलन करून सरकारला जागे करण्याचे काम केले जाणार आहे.

राज्यात तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाहीत. तारीख पे तारीख आणि सत्ता आपल्या खिशात असा खेळ सुरु आहे. मुख्यमंत्र्यांना राज्यातील सर्व सत्ता आपल्या हाती हवी आहे आणि केंद्रात पंतप्रधानांना सर्व सत्ता हाती हवी आहे. यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणालाच भाजपा सरकारने हरताळ फासला आहे. मुदत संपूनही निवडणुका घेतल्या नसल्याने लोकप्रतिनिधींमार्फत नगर सेवकांमार्फत जनतेची जी कामे होत होती ती आता होत नाहीत. प्रशासन, पालकमंत्री, आमदार यांची ठेकेदारी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर ४ मार्च रोजी महानगरपालिका क्षेत्रात आंदोलन करून काँग्रेस पक्ष जनतेच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधून घेणार आहे, असेही सपकाळ यांनी सांगितले.

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, मंत्र्यांचे पीए, पीएस नियुक्त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी १०६ जणांना क्लिन चिट देत मान्यता दिली तर १६ जण फिक्सर होते म्हणून त्यांना नियुक्ती दिली नाही असे म्हटले आहे. मुख्यमंत्री यांनी त्या १६ फिक्सर अधिकाऱ्यांची नावे जाहीर करावीत व त्या फिक्सर मंत्र्यांचीही नावे जाहीर करावीत ज्यांच्याकडे हे अधिकारी काम करत होते. फक्त अधिका-यांचा बळी घेऊन चालणार फिक्सर मंत्र्यांवरील कारवाई झाली पाहिजे अशी मागणी सपकाळ यांनी केली.जनतेची कामे होत नाहीत, प्रशासन ठप्प आहे या निराशेतूनच एका तरुणाने मंत्रालयात येऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. प्रशासनाच्या निर्ढावलेपणामुळे जनता त्रस्त आहे. महसूल विभागाचे अधिकारी बेकायदेशीर रिसॉर्टमध्ये पार्टी करतात, सर्व बेताल कारभार सुरु असून अधिकारी सैराट आणि मंत्री बेफिकीर आहेत, असेही काँग्रेस प्रांताध्यक्ष म्हणाले.

# उन्हाळी हंगामात 'ही' चारा पिके घ्या, अधिक उत्पादन मिळवा!

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक–**

उन्हाळी हंगामात जनावरांना हिरव्या चाऱ्याची गरज असते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार उन्हाळी हंगामात ज्वारी, बाजरी, मका, चवळी हीचाऱ्याची पिके घेऊन हिरव्या चाऱ्याची गरज भागवता येते. या पिकांसाठी मध्यम ते भारी जमीन निवडावी. पिकास ७ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे.

ज्वारी, बाजरी, मका या पिकांची लागवड मार्चपर्यंत तर चवळीची लागवड एप्रिल महिन्यापर्यंत करावी. हिरव्या चाऱ्यासाठी या पिकांची कापणी ६० ते ७० दिवसादरम्यान करावी. ज्वारी, बाजरी, मका या पिकाचे हेक्टरी ५५० ते ६०० क्विंटल तर चवळीचे हेक्टरी ३०० ते ३५० क्विंटल हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

हिरव्या चाऱ्यासाठी ज्वारीच्या रुचिरा, फुले अमृता, मालदांडी (एम–३५–१), एसएसजी–५९–३, एमपी–चारी, पुसा चारी या जातींची शिफारस आहे.

ज्वारीची पेरणी ३० सेंटीमीटर अंतरावर करावी.

हेक्टरी ४० किलो बियाणे वापरावे. हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावा.

यापैकी ५० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष







बाजरीचे जायंट बाजरा, राजको बाजरा हे वाण लागवडीसाठी वापरावेत.

पेरणी ३० सेंटीमीटर अंतरावर करावी. हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे.

हेक्टरी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावा.


यापैकी ३० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.

मकयाच्या आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, विजय, गंगासफेद–२ हे वाण लागवडीसाठी वापरावेत.

हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावा. यापैकी ५० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.



उन्हाळी हंगामातील चारा पिके







चवळीच्या श्वेता, इसी–४२१६ किंवा यूपीसी–५२८६ यापैकी उपलब्ध वाणाची निवड करावी.

हेक्टरी २० किलो नत्र व ४० किलो स्फुरद पेरणीपूर्वी द्यावे.

– डॉ. कल्याण देवळाणकर, सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ





## चालत तर रोजच असाल पण माहीत नसतील हे जबरदस्त फायदे, वाचाल तर रोज चालाल!





**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

पायी चालणं ही एक सगळ्यात सोपी, प्रभावी एक्सरसाईज मानली जाते. बरेच लोक रोज पायी चालायला जातात. त्यांना पायी चालण्याचे मोजकेच फायदे माहीत असतात. तर बरेच लोक पायी चालण्याला महत्व देण्याऐवजी हार्ड एक्सरसाईज करण्यावर भर देतात. मात्र, पायी चालणं ही एक अशी एक्सरसाईज आहे ज्याद्वारे तुम्ही अनेक समस्या दूर करू शकता आणि खूपसारे फायदे मिळवू शकता. ज्याबाबत लोकांना कमीच माहीत असतं.

**पायी चालण्याचे फायदे** – रोज पायी चालल्यास वजन कमी होतं, हृदय निरोगी राहतं, स्नायू मजबूत होतात आणि मानसिक आरोग्यही चांगलं ठेवण्यास मदत मिळते. जर योग्य पद्धतीनं पायी चालाल तर कोणत्याही हाय इंटेंसिटी एक्सरसाईज इतकाच यातूनही फायदा मिळतो.

**स्नायू मजबूत होतात**– जिम ट्रेनर म्हणत असतील की, पायी चालल्यानं स्नायू मजबूत होत नाहीत. मात्र, नियमितपणे पायी चालल्यास शरीरातील अनेक स्नायू सक्रिय होतात. खासकरून काफ, हॅमस्ट्रिंग, क्वाड्रिसेप्स आणि कोर मसल्स मजबूत होतात. खड्डे, उंचवटे असलेल्या जमिनीवर चालल्यास स्नायूंची ताकद वाढते.

**मानसिक आरोग्य चांगलं राहतं**– पायी चालणं केवळ शरीरच नाही तर मानसिक आरोग्यासाठीही चांगलं असतं. १० ते १५ मिनिटं रोज वेगानं चालल्यास स्ट्रेस वाढणारं कोर्टिसोल हार्मोन कमी होतं आणि मूड चांगला होतो. जेव्हाही काही गोड खाण्याची इच्छा होत असेल तर १० मिनिटं पायी चाला. असं केल्यास भूक नियंत्रित होईल आणि इमोशनल ईटिंग टाळता येईल.

**चप्पल–शूज न घालता चाला**– चप्पल किंवा शूज न घालता गवत किंवा वाळूवर चालल्यास पायांचे स्नायू मजबूत होतात आणि संतुलन सुधारतं. आधुनिक शूजमुळे पायांची नॅचरल शक्ती कमी होते, त्यामुळे रोज १५ ते २० मिनिटं गवत किंवा वाळूवर शूज न घालता चालावं.


**आयुष्य वाढवा**– रोज पायी चालल्यानं शरीरातील ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं. सूज कमी होते आणि त्वचाही चांगली राहते. जर तुम्हाला अँटी–एजिंग फायदा मिळवायचा असेल तर आठवड्यातून दोनदा स्ट्रेंथ ट्रेनिंगसोबतच नियमितपणे चालण्याची सवय लावा.

# कृषीमंत्री कोकाटे यांच्या शिक्षेवरील निकाल राखीव; सुनावणी पूर्ण; १ मार्चला ठरणार भवितव्य

## कोकाटे यांच्यातर्फे ड.अविनाश भिडे यांनी केला युक्तीवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५नाशिक–** कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देण्याबाबतचा निकाल न्यायालयाने राखून ठेवला. १ मार्चला निकाल जाहीर केला जाणार असून अर्जावरील सुनावणी मंगळवारी (दि.२५) पूर्ण झाली. शिक्षेच्या स्थगितीवर सुनावणी घेण्यात आली. जिल्हा न्यायाधिश नितीन जीवने यांच्यासमोर सरकार पक्षातर्फे ड.कोतवाल तर कोकाटे यांच्यातर्फे ड.अविनाश भिडे यांनी युक्तीवाद केला.



जिल्हा न्यायालयाने मंत्री कोकाटे यांच्यासह त्यांचे भाऊ विजय कोकाटे यांना कादपत्रांची फेरफार अन् फसवणूक केल्याप्रकरणी दोन वर्षांची शिक्षा ठोठावली होती. या निर्णयाला कोकाटे यांना आव्हान देत शिक्षा स्थगितीसाठी अर्ज दाखल केला होता. त्या अर्जावर मंगळवारी सुनावणी पार पडली. न्या.जीवने यांनी निर्णय राखीव ठेवला. यावरील निकाल आता १ मार्चला दिला जाईल.

# अमरावतीच्या संत्रा विक्रेत्याला लावला चूना

# तामीळनाडूच्या व्यापाऱ्याकडून २३ लाखाने फसवणूक





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –** अमरावतीच्या फळ विक्रेत्याकडून तब्बल २३ लाख १४ हजार ७८२ रुपयांचा संत्रा विक्रीसाठी घेऊन तामीळनाडूचा व्यापारी पैसे देण्यासाठी चार वर्षापासून टाळाटाळ करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. फसवणूक करणाऱ्या तामिळनाडूच्या व्यापाऱ्याविरुध्द राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.अमरावतीचे फळ विक्रेते काजी अजरुद्दीन काजी अन्सारी उद्दीन (वय ३३) यांची कवर नगर येथे एफ सी फ्रूट कंपनी आहे. ते महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही फळ विकण्याचा व्यवसाय करतात. आरोपी मुरुगन वेल्लू (रावेलुनगर, मदुराई, तामिळनाडू) हा त्यांच्याकडून संत्रा घेऊन तामिळनाडूत विक्री करीत होता. तसेच मालाची विक्री झाल्यानंतर मार्च अखेरला वर्षाचे पैसे देत होता.परंतु सन २०१९ ते २०२१ दरम्यान माल घेऊन गेल्यानंतर त्याने पैसे देण्यासाठी टाळाटाळ केली. त्याच्याकडे २३ लाख १४ हजार ७८२ एवढी रक्कम थकीत आहे. यासंदर्भात अमरावतीचे फळ विक्रेते काजी अजरुद्दीन काजी अन्सारी उद्दीन यांनी राजापेठ पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीविरुध्द कलम ३१८–४ बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# मयत सावकाराच्या परवान्यावर अवैध सावकारी

# अमरावतीत अवैध सावकाराच्या ३ ठिकाणी धाडी

## आनंदनगर, महाजनपूरा, गडगडेश्वर भागात कार्यवाही

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ अमरावती** – गेल्या तीन महिन्यांपासून जिल्ह्यात अवैध सावकारांवर सुरु असलेले धाडसत्र सुरुच आहे मंगळवारला पुन्हा अमरावती शहरातील तीन अवैध सावकारांच्या ठिकाणांवर धाड टाकण्यात आली. उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावतीच्या पथकाने ही आनंदनगर, महाजनपूरा, गडगडेश्वर भागात ही कार्यवाही केली.मयत परवाना धारक सावकार अजय राजू बावर यांच्या मयतीनंतर त्यांच्या सावकारी परवान्यावर बेकायदेशीर व्यवहार करीत असल्याची तक्रार उपनिबंधक सहकारी संस्था यांना प्राप्त झाली होती. या तक्रारीची दखल घेत शंकर कुंभार, जिल्हा उपनिबंधक, सहकारीसंस्था, अमरावती यांनी कार्यवाही करण्यासाठी तीन धाड पथकाची नेमणूक केली. त्यावरून खोलापूरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील संबंधीत महीला सावकार रा. गडगडेश्वर मंदीरजवळ, तसेच तिचा मदतनीस रा. आनंद नगर, अमरावती यांचे घरी आणि मयत परवानाधारक सावकार अजय राजूबाबर यांचे बंद दुकानात धाड व झडतीची कार्यवाही करण्यात आली.पथक नं. १ – पथक प्रमुख राजेश यादव (सहायक निबंधक सहकारी संस्था अंजनगाव सुर्जी), मनोज रोहणकर, श्रीमती उषा मून, अमोल लोमटे, पंच अरविंद सवाई व प्रशांतदारोकार, पोलीस रंजीत नाकट व श्रीमती सोनानी जवंजाळ यांनी मदतनीस रा. आनंद नगर अमरावती यांचे घरी धाड, झडतीची कार्यवाही दुपारी १२.२० वा. सुरु करुन दुपारी २.०० वाजेपर्यंत पुर्ण केली. पण धाड पथकास अवैध सावकारी संबंधाने कोणतेही दस्तऐवज या ठिकाणी प्राप्त झालेले नाही.



पथक क्र. २ प्रथक प्रमुख स्वाती गुडधे (सहायक निबंधक, सहकारी संस्था, अमरवती), सुधीर मानकर, उज्ज्वला मोहोड, राहूल पूरी पंच प्रितम बेलसरे व नितीन वाघाडे पोलीस श्रीमती अश्विनी मेण यांनी संबंधितमहीला रा. गडगडेश्वर मंदीर जवळ, अमरावती यांचे घरी धाडी/झडतीची कार्यवाही दुपारी १२.३० वा.सुरु करुन संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत पूर्ण केली.मयत परवाना धारक सावकार अजय राजू बावर, यांचेकडे सावकारी परवाना असतांना सुध्दा त्यांनी त्यांच्या हयातीत बेकायदेशीरपणे कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यात कर्जदार यांचेकडून एकूण ७९ कोरे स्वाक्षरी असलेले विविध बँकेचे धनादेश, रुपये १०० चे कोरे स्टॅम्पपेपर, एकुण ३ दुचाकी वाहनांच्या नोंदणी प्रमाणपत्र (फउ.) एकुण १० घेतल्याचे निदर्शनास आल्याने सदर सर्वदस्तऐवज धाड पथकाने चौकशीकरीता ताब्यात घेतलेले आहे.

पथक्र. ३– पथक प्रमुख श्रीमती प्रीती धामणे (सहायक निबंधक सहकारी संस्था तिवसा), शिल्पा कोल्हे, नरेंद्र इंगळे, अझहर खान, पंच शुभम चौधरी व केशव खंडारकर, पोलीस–श्रीमती रुपारी खंडार यांनी मयत परवाना धारक सावकार अजय राजू बाबर यांचे आनंद नगर, महाजनपूरा रोड, अमरावती येथील दुकानात धाड झडतीची कार्यवाही दुपारी १.१५ वा. सुरु करुन दुपारी २.१० वाजेपर्यंत पुर्ण केली, पणतिथेही अवैध सावकारी संबंधाने कोणतेही दस्तऐवज प्राप्त झालेले नाही. सदर प्रकरणात जप्त केलेल्या कागदपत्रांची पडताळणी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील तरतुदीनुसार श्री सचिन पतंगे, चौकशी अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था अमरावती हे मयत परवाना धारक सावकार अजय राजू बाबर यांचे कायदेशीर वारस यांना चौकशीकरीता बोलविण्यात येऊन मयत परवानाधारक सावकार यांचा सावकारी परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. असे सहकार अधिकारी अविनाश महल्ले यांनी सांगीतले आहे.

# एका अपात्र प्रकरणी हायकोर्टाचा स्टे, पण... दुसऱ्या प्रकरणात येवद्याच्या सरपंच पुन्हा अपात्र!

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धडकले २६ जानेवारीला ग्रामसभा न घेणे भोवले

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६ येवदा**

तालुक्यातील येवद्याच्या सरपंच प्रतिभा माकोडे यांच्यावर मागील महिन्यामध्ये



विभागीय आयुक्तांकडून अपात्रेचे कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यावर हायकोर्टाची स्थगिती आणली होती. त्यानंतर प्रकरणात सोमवारी त्यांना पुन्हा सदस्य व सरपंच पदावरून अपात्र करण्यात येत असल्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी दिला आहे. एका सरपंचावर दोन प्रकरणांत दोनदा अपात्र होण्याची ही कारवाई जिल्ह्यात पहील्यांदाच झाली असावी. जिल्हाधिकारी यांनी माकोडे यांच्यावर २६ जानेवारीची ग्रामसभा न. घेतल्याचा ठपका ठेवला आहे.

येवदा येथील तत्कालिन सरपंच प्रतिभा माकोडे यांच्या विरोधात जागेसंदर्भात शिवसेना ठाकरे गटाचे प्रदीप वडतकर यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांना जानेवारीमध्ये सरपंच आणि सदस्य पदावरून अपात्र घोषित केले होते. मात्र त्यांनी उच्च न्यायालयातून या आदेशावर तीन आठवड्याची स्थगिती आणली होती. दरम्यान त्यांनी राज्य शासनाकडे या निकालाविरोधात अपिल दाखल केली.

आठ ते दहा दिवसांपुर्वी तीन आवठड्याची मुदत संपल्याने त्यांचे सरपंचपद खारीज करीत उपसरपंच यांना सरपंचदांचा पदभार सोपविण्यातआला. परंतु सोबतच प्रदीप वडतरकर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दुसऱ्या प्रकरणात त्य त्यांना अपात्र करण्यात यावे अशी याचिका दाखल केली होती. त्यांचा सोमवारी निर्णय देण्यात आला. आधीच अपात्र सरपंचाप्रतिभामाकोडेयांना पुन्हा सदस्य आणि सरपंच पदाकरिता अपात्र ठरविले. एकाच सरपंचावर दोन प्रकरणात दोनदा अपात्रेची कारवाई झाली. परंतु या आदेशाविरोधात माकोडेयांना उच्च न्यायालयाने १९ डिसेंबर २०२४ लाच स्थगिती दिली आहे. निकाल लागल्यापासून चार आठवडे जिल्हाधिकारी यांचा आदेश लागू राहणार नाही. असे उच्च न्यायालयाच्या आदेशात नमुद आहे.

### ग्रामसभा न घेतल्याने अपात्रतेची कारवाई

शासन नियमाप्रमाणे २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे आणि २ ऑक्टोंबर या चार दिवशी ग्रामसभा घेणे अनिवार्य आहे. यातही २६ जानेवारीचा ग्रामसभा ही त्याच दिवशी घेणे क्रमपात्र असताना तत्कालिन सरपंच माकोडे यांनी २६ जानेवारी २०२४चीग्रामसभाही ३० जानेवारी २०२४ला, घेतली आहे. त्यामुळे या प्रकार नियमांचे उल्लंघन असल्याने त्यांनासरपंचव सदस्य पदावरून अपात्र घोषित करण्यात आले. जिल्ह्यात ग्रामसभा नघेतल्याने अपात्रेचीही पहीलीच कारवाई जिल्हाधिकारी यांनी केली आहे.

## मेळघाटच्या सिमोरी गावात पुन्हा अघोरी प्रकार

# २२ दिवसांच्या बाळाच्या पोटावर सळईने चटके

विर्भ प्रजासत्ताक

**दि.२६चिखलदरा–** मेळघाटातील अतिदुर्गम भागात बुवाबाजीचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. मांत्रिकाच्या सांगण्यावरुन अघोरी उपचार केले जातात. आदिवासी माता या अंधश्रद्धेला बळी पडतात, असाच एक धक्कादायक अघोरी उपचाराचा प्रकार चिखलदरा तालुक्यातील सिमोरीगावात उघडझाल्याने मेळघाटासह संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम गाव असलेल्या सिमोरी गावात एका २२ दिवसाच्या बाळाचा उपचार करण्यासाठी पोटावर लोखंडी सळईचे गरम चटके लावून अमानुष उपचार करण्यात आले आहे. त्यामुळेपुन्हा मेळघाटच्या आरोग्य यंत्रणेवर प्रश्नचिन्ह लागलेले आहे.

धारणी पासून ९० कि.मी. अंतरावर चिखलदरा तालुक्यात अतिदुर्गम भागात सिमोरी हे गाव येते. यादुर्गमगावात दोनदिवसापूर्वी नवजात बाळाच्या पोटावर ६५ चटके लावून डाग दिल्याची गंभीर घटना घडली. हतरू भागातील सिमोरी गावातील या प्रकारामुळे मेळघाटच्या आरोग्य यंत्रणा आणि जनजागरण करण्याचा दावा करणाऱ्या समूहांच्या कारभाराविषयी चर्चा सुरू झालेली असून प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



### अचलपूरवरून अमरावती रेफर

बाळाला अचलपूर उपजिल्हा रूग्णालयात भरती करण्यात आलेले होते. नंतर अमरावतीरेफर करण्यात आले. अमरावतीच्या जिल्हा स्त्री रूग्णालयात उपचार सुरू असून बाळाची प्रकृती स्थिरच आहे. याविषयी आरोग्य विभागाकडे माहिती मागितली असता उपचार योग्यपणे सुरू असल्याचे सांगण्यात आले.

### नव्याने योजना आखणे गरजेचे

१९९३ पासून म्हणजे कुपोषण विश्वपटलावर आल्यापासून आरोग्य यंत्रणा कामावर लागलेली होती. ३२ वर्षानंतर सुध्दा बाळाच्या पोटावर अगदी अनैसर्गिकपणे गरम चटके देऊन उपचार करण्याची पध्दत सुरू असल्याने शासनाने नव्याने योजना आखण्याची गरज आहे. वीज, पाणी, रस्ता, मोबाईल कव्हरेजसाठी तरसणाऱ्या या सिमोरीचे नाव आता बाळाच्या पोटावर चटके देऊन उपचाराच्या अमानुष घटनेसाठी ओळखले जाणार आहे.

# मिहानमधील पतंजली फूड ॲण्ड हर्बल पार्कचे ९ मार्चला उद्घाटन

## विदर्भातील संत्रा उत्पादकांना येणार अच्छे दिन , शेतकऱ्यांकडून कच्च्या मालाची होणार खरेदी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६नागपूर : –** मिहान – सेझमधील पतंजलीच्या आशियातील सर्वात मोठ्या फूड आणि हर्बल पार्कमधील 'ज्यूस युनिट'चे उद्घाटन ९ मार्च रोजी सकाळी १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमात मुख्य अतिथी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह पतंजली समूहाचे प्रमुख बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण उपस्थित राहतील. या प्रकल्पाचे भूमिपूजन सन २०१६ मध्ये करण्यात आले होते, हे विशेष.प्रकल्पात लागणारा बहुतांश कच्चा माल विदर्भातील शेतकऱ्यांकडून खरेदी करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची माहिती देणारा व्हिडिओ स्वत: बाबा रामदेव यांनी जारी केला आहे. कार्यक्रमाला सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमासाठी मी ८ तारखेला नागपूरला पोहोचणार असल्याचे व्हिडिओत म्हटले आहे.



एक हजारांहून अधिक कोटींची गुंतवणूक पतंजली समूहाने पतंजली फूड अँड हर्बल पार्कसाठी विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) आणि सेझबाहेर अर्थात मिहानमध्ये १०० एकराहून अधिक जमीन खरेदी केली आहे. समूहाची मिहानमध्ये ४१८ एकर जमीन आहे. कंपनी या प्रकल्पावर एक हजाराहून अधिक कोटींची गुंतवणूक करणार आहे. प्रकल्पात टप्प्याटप्प्याने नवीन उत्पादने जोडली जातील. कंपनीसाठी हा एक महत्त्वाचा प्रकल्प असेल जिथे विविध उत्पादने तयार केली जातील. प्रकल्पामध्ये यंत्रसामग्री आधीच बसविण्यात आली आहे. काहींचे उत्पादन सुरू झाले आहे. आता प्रतीक्षा संपली असून ९ मार्च रोजी अधिकृतपणे उद्घाटन होणार आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांकडून कच्च्या मालाची खरेदी

रामदेव बाबा म्हणाले, प्रकल्पाला लागणारा कच्चा माल सर्वात महत्त्वाचा असतो. बहुतांश माल विदर्भातील शेतकरी आणि लगतच्या भागातून खरेदी केला जाईल. प्रकल्पामध्ये ज्यूससोबत इतरही अन्नपदार्थही तयार केले जातील. संत्र्याचा रस तयार करण्यासाठी दररोज ८०० ते ९०० टन संत्रा लागेल. या प्रकल्पामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची आर्थिक समृद्धी आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

# कवींनी गाजविली 'वाहवा मैफिल'ज्ञानपथ प्रकाशनाचा उपक्रम

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** – मराठी शायरी आणि कवितांच्या अनोख्या संगमाने रसिकांना मंत्रमुग्ध करणारी वाहवा ! ही विशेष काव्य मैफल. ज्ञानपथ प्रकाशनाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून नुकताच आयोजित करण्यात आली होती.

अभियंता भवन, शेगाव नाका येथे आयोजित मराठी शायरी व कवितांची मैफिल वाहवा ! हा अनोख्या साहित्यिक कार्यक्रम 'अभिजात मराठीचा उत्सव' या संकल्पनेखाली घेण्यात आला. यंदा मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याचा आनंद सर्व मराठी प्रेमींना झाला आहे. या ऐतिहासिक घटनेचा आनंद म्हणून ज्ञानपथ पब्लिकेशनच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून या काव्य मैफिलीचे आयोजन करण्यात आला होते. या मैफिलीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक हेमंत खडके तर प्रमुख पाहुणे म्हणून



ज्येष्ठ नागरिक ज्ञानेश्वर सुकलकर होते. कार्यक्रमाचे सादरकर्ते ज्ञानेश्वर गटकर होते, तर सूत्रसंचालन सुरेश हिरे यांनी केले. यांनीच हास्यरसाचा काव्यमय आविष्कार सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध करत वाहवा मिळवली. मराठी शायरी व कवितांची मैफिल या कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानपथ प्रकाशनाचे प्रकाशक सचिन सुकलकर, सुशील सुकलकर तथा गुरुदेव प्रिटर्सचे संचालक चंद्रकांत सुकलकर व जगदीश सुकलकर यांनी केले होते.

# पोलीस कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे उद्या आंदोलन

## काळे कपडे परिधान करणार; प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्याचा करणार प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक– दि.२६अमरावती–** : महाराष्ट्राच्या पोलीस विभागातील सर्व कार्यालयीन कर्मचारी वर्गाची दीर्घ कालावधीपासून रखडलेली पदोन्नती तसेच इतर ३३ प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी (ता. २७, फेब्रुवारी) राज्यातील सर्व पोलीस कार्यालयीन कर्मचारी काळे कपडे परिधान करून लक्षवेधी आंदोलन छेडणार आहेत.

मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्यातील सर्व पोलीस घटक प्रमुखांना हे निवेदन देण्यात आले आहे. २७ फेब्रुवारीला आंदोलनाच्या दिवशी सर्व कर्मचारी संपूर्ण वेळ काळे कपडे परिधान करून काम करणार आहेत. सकाळी ११.३० वाजता सामूहिक स्वरूपात आपल्या मागण्यांचे निवेदन पोलीस महासंचालकांच्या नावे लेखी स्वरूपात प्रत्येक घटक कार्यालयाच्या प्रमुखांकडे देणार आहेत.जेवणाच्या वेळेत कार्यालयाच्या बाहेर मोक्याच्या ठिकाणी एकत्र येऊन मागण्यांचे फलक दर्शविण्यात येणार आहेत. हे आंदोलन एक सुरुवात असून केवळ लक्ष वेधण्यासाठी असल्याने कोणीही घोषणाबाजी करणार नाहीत. पोलीस कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे काही जिव्हाळयाचे प्रलंबित प्रश्न तसेच काही दैनंदिन प्रशासकीय स्वरुपाच्या अडचणी प्रदीर्घकाळ निर्णयाविना प्रलंबित आहेत.संदर्भाधीन कालावधीतील संघटनेच्या चार पत्रांद्वारे संघटनेने कैफियत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, त्यासंदर्भात चर्चेची कवाडे उघडून संघटनेसह अद्याप कोणत्याही स्वरुपाची सकारात्मक चर्चा होऊ शकलेली नाही. प्रलंबित मागण्यांच्या सनदशीर चर्चेच्या माध्यमातून बऱ्याचशा समस्यांचे निराकरण पोलीस महासंचालक स्तरावर होईल, अशी कर्मचाऱ्यांची धारणा आहे. त्यासाठी चर्चेसाठी संधी मिळावी, यासाठी करीत असलेल्या सततच्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. हे आंदोलन छेडणार असलो तरीही आंदोलनाच्या दिवसापूर्वी पोलीस महासंचालकांकडून आपल्या चर्चे ला वेळ देणे व मागण्यांबाबत योग्य ती दखल घेण्यात येऊन सकारात्मक पाऊल उचलावीत, असेही कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे.मागण्यांच्या पूर्ततेसाठी आंदोलन करणे हे पोलीस दलाच्या शिस्त व नियमात बसत नाही.प्रशासनाने पुढाकार घेऊन राज्य कर्मचाऱ्यांमधील एका महत्वाच्या कर्मचारी घटक समूहाच्या प्रलंबित मागण्यांबाबत योग्य निर्णय घेऊन कर्मचारी वर्गास दिलासा द्यावा, अशी अपेक्षा या निवेदनात व्यक्त केली आहे. रश्मी शुक्ला यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे

# फोटोग्राफरविरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल

## लग्नात फोटो काढण्याकरिता आला होता

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती–** लग्नात फोटो काढण्याकरिता बोलाविलेल्या फोटोग्राफरने वधूच्या लहान बहिणीचा विनयभंग केल्या प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून राम टाले (वय २५ रा. कठोरानाका) या फोटोग्राफरविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

राम टाले याला वधूच्या वडिलाने मुक्ताई पॅलेसमध्ये लग्नाचे फोटो काढण्याकरिता बोलाविले होते. तेव्हा वधूसोबत तीची लहान बहिणसुध्दा होती. फोटोग्राफर वधूचे फोटो काढायचे सोडून तिच्या लहान बहिणीकडे एकसारखा पाहत होता. त्यानंतर त्याने तिच्यासोबत बोलण्याचा प्रयत्न केला असता तिने नकार दिला.

एक महिन्यानंतर लग्नात काढलेल्या फोटोची त्याला मागणी केली. तेव्हा त्याने पीडितेच्या इन्स्टाग्रामवर फोटो कसे आले आणि तू केव्हा लग्न करणार, तू मला खूप आवडते, माझ्यासोबत लग्न करते का, असे सतत मॅसेज केले.दरम्यान युवती मावशीसोबत कठोरा नाका येथून जात होती तेव्हा तीचा पाठलाग करून बोलण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळे तीने सर्व प्रकार मावशीला सांगितला आणि तेव्हाच ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.


# अमरावतीत बोलावून विवाहितेला शिविगाळ, मारहाण

## दुचाकी आणि पैशांसाठी शारीरिक, मानसिक छळ

## सहनशक्तीचा अंत झाल्याने विवाहितेची पोलीस ठाण्यात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६कारंजा लाड**

समाज माध्यमावर तरुण-तरुणीची ओळख झाली. या ओळखीतून भेटी गाठी त्यातून प्रेम निर्माण झाले. कुटुंबीयांचा विरोध असतानाही दोघांनी प्रेम बिवाह केला. मात्र, पुढे नको तेच घडले. काही महिने सुरळीत गेल्यानंतर पती व सासरच्यांकडून विवाहितेचा दुचाकी आणि पैशांसाठी शारीरिक, मानसिक छळ सुरू झाला. सहनशक्तीचा अंत झाल्याने विवाहितेने पोलीस ठाण्यात धाव घेतली. विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी पतीसह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



समाज माध्यमे तरुणाईच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत तरुणाई समाज माध्यमावर सक्रिय असते. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप, युट्युब अशा माध्यमांचा वापर करण्यात आजची तरुण पिढी अग्रेसर आहे.

या आभासी जगातून मैत्रीचे नाते जोडल्या जाते. तरुणव तरुणीमधील आकर्षणातून प्रेम संबंध सुरू होण्याचेप्रकार अनेक वेळाघडतात. कुटुंब व समाज यांचा विरोध पत्करून जोडपे विवाह बंधनात देखील अडकतात. मात्र, हे नाते फार काळ टिकत नाही. टोकाची भूमिका घेतली जाते. असाच एक प्रकार अकोला जिल्ह्यात समोर आला आहे. समाज माध्यमातील ओळखीतून प्रेम व त्यानंतर जोडप्याने विवाह केला. मात्र, काही दिवसांतच विवाहितेचा छळ सुरू झाला. प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचले.गीता पवन आठवले (वय २३, ह.मु, जवळा बु., ता.जि. अकोला) यांनी बोरगांवमंजू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांचे पती पवन वसंता आठवले (रा. पिप्री, ता. कारंजा, जि. वाशीम) यांच्यासोबत समाजमाध्यमातील ओळखीनंतर त्यांनी १० सप्टेंबर २०२२ रोजी अकोला येथे विवाह केला. पतीच्या कुटुंबीयांनी हा विवाहमान्य केला नाही. लग्नानंतर काही दिवसांनीच पती व सासरच्या मंडळींनी दोन लाख रुपये व एक बुलेट गाडीच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ सुरू केला. सासू पद्मा आठवले यांनी जबरदस्ती घरकाम करून घेतलेआणि अन्नातून विषबाधा करून गर्भपात घडवून आणल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. अमरावती येथे बोलावून शिवीगाळ व मारहाण केल्याचेही फिर्यादीत नमूद केले. सासरच्यांनी तडजोडीस नकार दिल्याने अखेर विवाहितेने बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पती पवन आठवले, सासू पद्मा आठवले, सासरचे रोहन आठवले, पवनचा चुलत जावई धम्मदीप तायडे आणि दीक्षा तायडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# महापालिकेने वसूल केले ३० लाखांचे जाहिरात शुल्क

## बाजार परवाना विभागासाठी उत्पन्नाचे एक दालन खुले

## २०१७ नंतर दर निश्चितीनंतर वसुलीस प्रारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

अमरावती महापालिकेच्या बाजार परवाना विभागात बंद पडलेला उत्पन्नाचा एक मार्ग खुला झाला आहे. महापालिकेस आता जाहीरात शुल्क वसूल करता येणार आहे. त्यासाठी तात्पुरते व कायमस्वरूपात जाहीराती असे दोन प्रकार करण्यात आले आहे मनपाने तीन रूपये प्रती चौरस फुट प्रती माह असे जाहीरात शुल्क लागू केले आहे. या दराने



आता गेल्या तीन वर्षातील थकीत असलेल्या ७८ लाख रूपये शुल्कापैकी ३० लाख रूपये वसूल केले आहेत.

१ जुलै २०१७ मध्ये जाहिरात शुल्क जीसटीमध्ये समाविष्ट करण्यात आल्याने जाहिरातदारांनी महापालिकेस हे शुल्क देण्यास नकार दिला होता. त्यामुळे मनपाचा उत्पन्नाचा एक स्रोत कमी झाला होता. शासनाने यावर धोरण निश्चित न केल्याने मनपाला इतर मागनिही शुल्क घेता आलेले नाही. दरम्यान ९ मे २०२२ ला शासनाने धोरण निश्चित केल्यानंतर हा मार्ग मोकळा झाला. शासनाच्या धोरणानंतर महापालिकेने जाहीरात शुल्काचे दर ठराव घेत निश्चित केले. त्यानुसार तीन रूपये प्रती चौरस फुट प्रती माह असा दर आकारण्याचे अंतिम झाले. यामध्ये तात्पुरत्या जाहीरात होडींगसाठी झोननिहाय सहायक आयुक्त तर कायम जाहिरात होडींग्जसाठीबाजार व परवाना विभागाकडून शुल्क वसूली करण्यात येणार आहे. धोरण निश्चितीनंतर मनपाने जाहीरातदारांना नोटीस बजावल्यात असून एकूण २६५ धारकांपैकी १०८ जाहीरातधारकांनी न्यायालयात आव्हान दिले, तर उर्वरित १३४ पैकी काहींनी या व्यवसायातूनच माघार घेतली. गेल्या तीन वर्षात मनपाच्या क्षेत्रातील जाहीरातदारांची संख्या कमी झाली असून ती १५० अशी गृहीत धरण्यात आली आहे. त्यांच्याकडे ९ मे २०२२ ते २४ फेब्रुवारी २०२५ अशा तीन वर्षात ७१ लाख रूपये थकीत होते. त्यापैकी २४ लाख रूपये वसूल झाल्याचे सांगण्यात आले.

# सीईओ संजीता महापात्र यांच्याकडून आढावा

## पीएम आवास योजनेच्या लाभार्थ्यासोबत चर्चा



### गावपातळीवरील विकास कामांची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती,**पंचायत समिती नांदगाव खांडेश्वर अंतर्गत ग्रामपंचायत जनुना, माहुली चोर, पापळ व वाढोणा रामनाथ येथे सीईओ संजीता महापात्र यांनी भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. संजीता महापात्र यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी केंद्रांची तपासणी करून तेथील सुविधांचा आढावा घेतला. तसेच पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत (झच-) लाभार्थीची प्रत्यक्ष भेट घेऊन योजनेच्या अंमलबजावणीबाबत माहिती जाणून घेतली.

ग्रामस्थांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागू नये म्हणून त्यांनी संबंधित भागाची पाहणी करून उपाययोजनांबाबत चर्चा केली. दरम्यान, वाढोणा रामनाथ येथेआयोजित पशुपालन प्रदर्शन व मेळाव्यात साधलावत्यांना मार्गदर्शन केले. पशुधनाच्या संगोपनासंबंधी महत्त्वपूर्ण सूचना देत, विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहनहीत्यांनी केले. यावेळी गट विकास अधिकारी स्नेहल शेलार, गट शिक्षणाधिकारी ठाकरे मॅडम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ सोळंके आदी अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अमडापूर येथील आरामशिनला सील

## ३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त, वनविभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६वरुड** - तालुक्यातील आरामशीनवर वनविभागाच्या पथकाकडून धाडसत्र राबविण्यात आले. या धाडसत्रादरम्यान अमडापूर येथील आरामशिनला सील करण्यात आले. तसेच ३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



मुसा खर्वा जब्बार खाँ पठाण (वय ५१, रा. वरूड) यांच्या मालकी हक्काची ही आरामशिन असून त्यांच्याविरुद्ध (पी.ओ.आर) प्रथम गुन्हा जारी करण्यात आला आहे. विजय राऊत (रा.जरूड) यांनी ही आरामशिन एक वर्षापासून भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी घेतल्याची माहिती वनविभागाला प्राप्त झाल्याने राऊत यांची सुद्धा याप्रकरणी वनविभागाकडून चौकशी करण्यात येणार असल्याचे कळते. प्राप्त माहितीनुसार, अमरावती येथील सहाय्यक वनसंरक्षक डॉ. मयुर भैलुमे व तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे यांच्या मार्गदर्शनात तालुक्यातील आरामशिनच्या चौकशीदरम्यान अमडापूर येथील आरामशिनवर एकुण अंदाजे २२० नग ३१.४१६ घनमिटर अवैधरित्या लड्डा (गोल) लाकुड आढळून आले. या ठिकाणी अवैधरित्या सापडलेल्या आडजात लाकडाची सकाळी ११.३० वाजतापासून तर रात्री ७.३० वाजेपर्यंत चौकशी व मोजमाप करण्यात आले. यामध्ये जळावु लाकुड २.५० घन मीटर, चिराण लाकुड (कटलेले) ६.१४९ घन मीटर आढळून आले. संबंधित आरामशिनवर अवैधरित्या आडजातलाकुड आढळून आले. मुसा खाँ जब्बार खाँ पठाण यांच्या उपस्थितीत त्याचा पंचनामा व एकुण ३ लक्ष ५० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर या आरामशीनला वनविभागाने सिल केले.शेखदरी वर्तुळ क्षेत्र सहाय्यक वनपाल एस. एस. इंगळे, वनरक्षक एम.जी. मनगटे, पी.आर. चावरे, डि.बि.वाघमारे, व्हि.एन. बोरकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# राजापेठ हद्दीतील घरफोडी प्रकरण३ लाख ३३ हजाराचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा युनीट एकची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

राजापेठ हद्दीत घडलेल्या घरफोडीच्या घटनेतील ३ लाख ३३ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने अटक केलेल्या आरोपीकडून जप्त करण्यात आले आहेत. स्थानिक गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने रविवारी ही कारवाई केली आहे.

राजापेठ पोलिसांनी अर्चना मेंढे यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा ६ मे २०२४ ला दाखल केला



होता. यानुसार ६ लाख ३५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल (दागीने व नगदी) अज्ञात आरोपीनेचोरुन नेला होता. पोलिसांनी याप्रकरणी एका विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेतले होते. या गुन्हयाचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्यायुनिट क्रमांक एकच्या पथकाने चोरीला गेलेल्या मुद्देमालापैकी ३ लाख ३३ हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामध्ये सोन्याचे मंगळसूत्र (किं २ लाख ६६ हजार) आणि एक सोन्याची लगड (किं. ६७हजार) याचा समावेश आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त कल्पना बारवकर, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर, यांच्या मार्गदर्शनाखाली पो नि गोरखनाथ जाधव, मनीष वाकोडे, प्रकाश झोपाटे, सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अल्लीमउद्दीन, खतीब आदींनी केली आहे.

# पोलीस आयुक्तालयाच्या महिला सेलमध्ये महिलांसह बाळाकरिता विशेष सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

पोलीस आयुक्तालयातील महिला सेलमध्ये येणाऱ्या महिलांना भेडणाऱ्या अडचणी लक्षात घेता पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी महिला सेलमध्ये विविध सुवीधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच महिला सेलचे कार्यालय आयुक्तालयातील बेसमेंटमध्ये सुरू करण्यत आले आहे.




पोलीस आयुक्त कार्यालयातील महिला सेलमध्ये कौटुंबीक वादाचे प्रकरण येत असल्याने तेथे येणाऱ्या महिलांची संख्या खुप जास्त असते तसेच त्यांच्यासोबत लहान मुले किंवा बाळसुध्दा राहते. अशा वेळी महिलांना स्तनपानाकरीता विशेष जागा उपलब्ध नसल्याने त्यांना कसेतरी स्तनपान करावे लागते. तर काही बाळ खेळायचे म्हणून रडतात. अशा वेळी महिलेची आवश्यक चौकशी होत नाही. या सर्व बाबी पाहता पोलीस आयुक्तांनी आयुक्तालयातील बेसमेंटमध्ये महिला सेल हलविले असून सेलमध्ये येणाऱ्या महिलाकरिता विशेष स्तनपानाची व्यवस्था तसेच लहान बाळांना खेळण्याकरिता काही साहित्य उपलब्ध करून दिले आहे. तसेच पूर्ण कार्यालयाची पाहणी करून कचऱ्याची विल्हेवाट करण्याचे सांगीतले. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे कार्यालयात येणाऱ्या व्यक्तीला थंड व शुध्द पाणी मिळायला पाहिजे या उद्देशाने प्रत्येक मजल्यावर तीन आरओ लावण्यात आले आहे

# मराठी भाषा गौरव दिन.....

## उद्या महानुभाव आश्रमाचा वार्षिक उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती** - मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने २७फेब्रुवारी रोजी नांदगाव पेठ येथील बाळापुर लेआउट मधील श्री चक्रधर स्वामी आध्यात्मिक शाळेचा वर्धापन दिन मोठ्या भक्तिभावाने संपन्न होणार आहे.प. पू.प. म. एकोव्यास बाबा गुंफेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव साजरा केला जाणार आहे. कार्यक्रमाला विशेषतः प.पू.प. म. कवीश्वर कुळाचार्य मोहनदादाकारंजेकर बाबा (राजापेठ, अमरावती),





आचार्य अशनाख्य बाबा (सेलू), आचार्य श्री पूजदेकर बाबा, पूजदा. आचार्य सोनपेठ कर बाबा (वलगाव) आणि आचार्य पंडितबाबालोणारकर (नवसारी) यांची उपस्थिती लाभणार आहे.चक्रोशीतील तसेच गुंफेकर गुरु संप्रदायातील अनेक भक्त-भाविक मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत.या अध्यात्मिक शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमास उपस्थित राहून भक्तीमय वातावरणाचा लाभघ्यावा, असे आवाहन चक्रधर स्वामी अध्यात्मिक शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची २७ ला बैठक

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** अखिल भारतीय मराठा महासंघाच्या विदर्भ विभाग पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक उद्या गुरुवारी (ता.२७ फेब्रुवारी) सकाळी ११ वाजता मनोर मांगल्य मंगल कार्यालय, जुना बायपास रोड, दस्तूर नगर चौक, अमरावती येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

विदर्भातील सर्व जिल्हा, तालुका, महानगर, शहर कार्यकारिणी पदाधिकारी, युवक, महिला पदाधिकाऱ्यांना राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार व राष्ट्रीय सरचिटणीस प्रकाश देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. या आढावा बैठकीनंतर वैभव निमकर यांचे शिवव्याख्यान पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिजाऊकमर्शियल को. बँक चे संस्थापक अध्यक्ष अविनाश कोठाळे, तसेच पंजाबराव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक तथा माजी नगरसेवक राजेंद्र महल्ले, माजी नगरसेविका सुरेखाताई लुंगारे, माजी नगरसेवक प्रदीप हिवसे, दीपकराव कोरपे, नितीन भेटाळू यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहून शिवव्याख्यानाचा लाभघेण्याचे आवाहन मनोहरराव कबले, कृष्णा अंधारे, नरेन्द्र मोहिते, गोपाळकृष्ण निचळ, भानुदास बोदडे पाटील, राजेंद्र ठाकरे, अण्णासाहेब धोटे, संकेत पाटील यांनी केले आहे.

# प्रयासद्वारे कॅन्सर शिबिराचे २७, २८ ला आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती** प्रयास अमरावतीद्वारे कॅन्सर रुग्णांसाठी यावेळी पहिल्यांदाच दोन दिवसांचे कॅन्सर योद्धा निवासी शिबीर २७ व २८ फेब्रुवारीला कॅन्सर रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित करण्यात येत आहे.२७ तारखेला सकाळी ११ वाजता सुरू होईल. २८ तारखेला दुपारी ४ वाजता संपेल. शिबिरामध्ये कॅन्सर रुग्ण व सोबत त्यांचा एक केअरटेकर अशा दोघांना प्रवेश देण्यात येईल. त्यांची निवास, भोजनाची व्यवस्था प्रयास सेवांकुर भवन, विमल नगर, फरशी स्टॉप अमरावती येथे करण्यात आलेली आहे. या शिबिरामध्ये डॉ जीवनलाल गांधी, डॉ अविनाश सावजी, राजश्री मोहोड या व इतर याशिवाय कॅन्सर रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांच्या अनुभवाचे शेअरिंग सुद्धा या शिबिरात होणार आहे. ज्यांनी आपल्या कॅन्सरवर यशस्वीपणे मात केलेली आहे अशा काही कॅन्सर योद्ध्यांचे अनुभवांचे शेअरिंग सुद्धा शिबिरात होणार आहे. या शिबिरात कॅन्सर असणारे, होऊन बरे झालेले, लाइट वा किमोथेरेपी सुरू असणारे असे सर्वच रुग्ण सहभागी होऊ शकतात. शिबिरात पूर्णवेळ उपस्थित असणे आवश्यक असेल. शिबिरात सहभागी होण्यासाठी आधी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. ८७६७९७८२५९, ९०७५८८३५६५, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## प्राथमिक आरोग्य उपकेंद्रातील प्रकार

# आयुष्यमान भारत गोल्डन कार्डसाठी नागरिकांची गर्दी

विदर्भ प्रजासत्ताकदि.२६वाठोडा शुक्लेश्वरः १२भातकुली तालुक्यातील खोलापूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या वाठोडा शुक्लेश्वर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड काढण्यासाठी नागरिकांची आरोग्य केंद्रात मोठ्या प्रमाणात गर्दी निर्माण झाली. नागरिकांना परतावे लागल्याचे चित्र दिसून येत आहे. आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड पासून अनेक नागरिक वंचितच राहत आहेत. आरोग्यविभागाने सर्वे करून नागरिकांचे गोल्डन कार्ड ऑनलाइन लिस्ट मध्ये नावे नाहीत त्यांचे नावे समाविष्ट करण्यात यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे प्रॉब्लेम व्यवस्थित झाल्यानंतर अॅप सुरळीत होणार आहे. कॅन्सर आजारावर जनजागृती कॅम्प सुरू आहे. ज्या लोकांची नावे असेल त्यांनी सेतू केंद्र, आशा वर्कर, उपकेंद्र, ग्रामपंचायत मधून काढू शकता अशी प्रतिक्रिया श्रुतिका रिपूरकर यांनी व्यक्त केली आहे.

# मुटकोर्ट स्पर्धेत डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा राज्यात डंका

## एकाच दिवशी विविध राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धेत उत्तुंग यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



राज्यभरात झालेल्या विविध राष्ट्रीय अभिरुप न्यायालय स्पर्धेत डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाने उत्तुंग कामगिरी करत भरघोस बक्षिसे मिळवली. या यशामुळे राज्यात पुन्हा एकदा आपला नावलौकिक मिळविण्यामध्ये डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाला यश प्राप्त झाले आहे.

दिनांक २२ फेब्रुवारी रोजी नांदेड येथील नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय मूटकोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती.यात डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयाचा संघ ज्यामध्ये ईश्वरी शिरभाते ,अल्फिया सईद ,व श्रावणी निस्ताने या विद्यार्थिनींचा सहभाग होता. विद्यालयाच्या या चमूने उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेत चे विजेतेपद व बेस्ट एडवोकेट ची दोन पारितोषिके असे एकूण तीन बक्षिसे मिळविली. त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

यासोबतच २२व२३ फेब्रुवारी रोजी ॲड एस. एस जाधवर विधी महाविद्यालय पुणे तर्फे राष्ट्रीय मुट कोर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयातर्फे अक्सा मिर्झा, सदिच्छा कांबळे व प्रथमेश थोरात या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्या चमूने उत्कृष्ट प्रदर्शन करत स्पर्धेचे उपविजेतेपद पटकाविले.

तसेच दिनांक २२व२३ मार्च रोजी संदीप युनिव्हर्सिटी नाशिक द्वारा आयोजित मुट कोर्ट स्पर्धेमध्ये विद्यालयाच्या चमुने भाग घेऊन स्पर्धेमध्ये ऋषिकेश काळकर या कॉलेजच्या विद्यार्थ्याने बेस्ट एडवोकेट हे पारितोषिक मिळविले. आदित्य उपाध्याय व प्रथमेश खोब्रागडे या विद्यार्थ्यांचा सुद्धा या संघामध्ये समावेश होता.या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी चमूंचे व चमूंचे मार्गदर्शक डॉ. राजेश पाटील व ड वैभव इंगळे यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# टॉयलेट नाही घरी, बायको गेली माहेरी; सासरी परतण्यासाठी ठेवली एक अट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अकोला**






अकोला जिल्ह्यातील दिग्रसचे विकास तायडे...भाऊ-भावांच्या संपत्तीची वाटणी झाली आणि शौचालय मोठ्या भावाला मिळालं... त्यानंतर विकासकडे शौचालय राहिलं नाही... त्यामुळे विकासच्या बायकोचा संयम तुटला आणि तिने थेट माहेर गाठलं. आता जोपर्यंत शौचालय बांधणार नाही तोपर्यंत परत न येण्याची अट विकासच्या बायकोनं घातलीय. त्यामुळे अकोल्यातील हा प्रसंग राज्यात चर्चेचा विषय ठरलाय.

बायको माहेरी गेल्यानंतर विकासने पत्नीला घरी परत येण्याची विनंती करत शौचालय बांधण्याचं आश्वासन दिलंय... विकास म्हणतो, मी ३०० रुपये रोजाने मजुरीवर जातो.. त्यात घरखर्च.. आता मी शौचालय बांधण्यासाठी कर्जही काढलंय..पण शौचालयाचं पाणी कुठं सोडायचं हा प्रश्न पुढं उभा ठाकलाय.मी ग्रामपंचायतीकडे विनंती केली.. शौचखड्डाही खोदण्याची परवानगी मागितली... मात्र त्यानंतरही मला ग्रामपंचायतीने परवानगी दिली नाही... आता ग्रामपंचायत शौचालय बांधण्यासाठीच ग्रामपंचायतीची आडकाठी आहे.. तर दुसरीकडे पत्नी माहेरी गेल्याने इकडे आड तिकडे विहीर झालीय... त्यामुळं मी गटविकास अधिकाऱ्याकडे ग्रामपंचायतीविरुद्ध तक्रार केल्याची माहिती विकासने दिलीय..

देशाचे पंतप्रधान मोदींनी लाल किल्ल्यावरुन देशातील महिलांच्या सन्मानासाठी स्वच्छ भारत योजनेच्या अंतर्गत घरोघरी शौचालय बांधण्याबाबत घोषणा केली होती... त्याची अंमलबजावणीही सुरु झाली... गावातील भींतींवर शौचालयासंबंधी घोषणा लिहील्या गेल्या...गावात दवंडीही पिटली जाऊ लागली आणि जो उघड्यावर शौचास जाईल त्याच्यासाठी दंडाचीही घोषणा झालीय...मात्र यानंतरही गावं हागणदारीमुक्त झाली नसल्याचं भीषण वास्तव समोर आलंय..पंतप्रधान मोदींच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधण्यासाठी ग्रामपंचायतीने १२ हजार रुपयांची मदत करणं अपेक्षित असताना आता दिग्रसमध्ये मात्र नागरिकांचीच कोंडी केली जातेय... त्यामुळे विकास अडचणीत सापडलाय...

घरात टॉयलेट नसल्यामुळे टॉयलेट एक प्रेमकथा सिनेमात दाखवल्याप्रमाणेच विकासची पत्नी माहेरी निघून गेलीय. यात विकास टॉयलेट बांधण्यासाठी धडपड करतोय.. मात्र एकीकडे दंडाची घोषणा करणारी ग्रामपंचायत आणि प्रशासनच त्याच्या शौचालय बांधण्याच्या इच्छेच्या आड येत असल्याचं चित्र आहे... त्यामुळे आतातरी ग्रामपंचायत विकासला शौचालय बांधण्यासाठी मदत करणार की त्याची बायकोला सासरी आणण्यासाठीची ससेहोलपट कायम राहणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# शेतीत नवा प्रयोग, 'मसाल्या'तून समृद्धी; अकोला जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांनी केली लागवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अकोला**



उत्पन्नवाढीची गरज ओळखून, जिल्ह्यातील एक हजार शेतकऱ्यांनी यंदाच्या रब्बी हंगामात मसाला पिकांची कास धरली आहे. एक हजार एकर क्षेत्रावर ही लागवड करण्यात आली आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी, उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या संकल्पनेतून मसाला पिके लागवडीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पारंपरिक पिकांना फाटा देत, एक हजार शेतकऱ्यांनी गेल्या सप्टेंबरमध्ये मसाला पिकांची लागवड केली. त्यापैकी काही पिकांची काढणी आटोपली आहे, तर काही पिके काढणीला आली आहेत. पारंपरिक पिकांच्या तुलनेत मसाला पिकांतून ५० ते ६० टक्के उत्पन्न वाढणार असल्याने, येत्या काळात जिल्ह्यात मसाला पीक लागवडीत वाढ होऊ शकते.यंदाच्या रब्बी हंगामात जिल्ह्यात शेतकऱ्यांनी कसुरी मेथी, सोप, ओवा, काळे जिरे आदी मसाला पिकांची लागवड केली.जिल्ह्यातील १०२ गावांत मसाला पीक लागवड केली आहे. त्यात अकोला तालुका ४२, बार्शीटाकळी ३४ आणि पातूरमधील २६ गावे आहेत.

**असे वाढत गेले मसाला पीक क्षेत्र**

| | |
|---|---|
| २२-२३ | निरंक |
| २३-२४ | ३० एकर |
| २४-२५ | १,००० एकर |

# तुम्हीही समृद्धी महामार्गाने प्रवास करता का? मग हे वाचाच, कारण तीन हजारांवर अपघातात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ नागपूर :**

नागपूर- मुंबई दरम्यानच्या समृद्धी महामार्गावर डिसेंबर २०२२ ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान अपघातांची संख्या वाढतच चालली आहे. परंतु मृत्यू संख्या मात्र वेगळेच काही चित्र दर्शवत आहे. या माहितीच्या अधिकारातून पुढे आलेल्या समृद्धी महामार्गावरील तपशीलाबाबत आपण जाणून घेऊ या. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर डिसेंबर २०२२ मध्ये ६९ अपघातात चौघांचा मृत्यू झाला. १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४ दरम्यान १ हजार ५४० अपघातात १३९ मृत्यू नोंदवण्यात आले. तर १ जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ दरम्यानच्या अकरा महिन्यांत या महामार्गावर १ हजार ६१४ अपघातात ८८ मृत्यू झाले. त्यातही वरील कालावधीत सर्वाधिक १९८ अपघात आणि २२ मृत्यू हे २०२४ च्या जून महिन्यात नोंदवण्यात आले.

# महाराष्ट्र भूषण पुरस्काराने पुंडलीक गोसावी सन्मानित



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

वैधर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्ट कारंजा, जिल्हा वाशिम संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्याने महेश भवन गायत्री नगर कारंजा, जिल्हा.वाशिम. येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजीत करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार सईताई प्रकाशदादा डहाके होत्या,कार्यक्रमाचे उद्घाटक मा.नामदार इंद्रनीलजी नाईक राज्यमंत्री उद्योग, महाराष्ट्र शासन.मा.आमदार हरीश पिंपळे कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष, मा.गिरधारीलालजी सारडा उद्योजक,निलेश सोमानी प्रदेशकार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघ मुंबई.अतिथी. मा.संजय कडोळे, अध्यक्ष विदर्भ लोक कलावंत संघटना महाराष्ट्र राज्य.अतिथी. मा.पूनम एकनाथ पवार, अध्यक्ष वैधर्भीयनाथ चॅरिटेबल ट्रस्ट कारंजा.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मा.एकनाथ पवार, सचिव वैधर्भीय नाथ चॅरिटेबल ट्रस्ट यांनी केले.पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्ष माननीय आमदार सईताई प्रकाशदादा डहाके व सर्व सन्माननीय अतिथी यांच्या उपस्थितीत.मा.पुंडलिक जनाबाई एकनाथ गोसावी अमरावती चे सुपुत्र यांना, मानाचा फेटा, शाल, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र पुष्पगुच्छ देऊन महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सामाजिक दायित्व तून सामाजिक कार्य, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, उद्योजकता विकास, उद्योग प्रशिक्षण क्षेत्रात कार्य, २५ वर्षापासून वरील सर्व कार्यात सहभाग, सामाजिक कार्यकर्ता म्हणून सामाजिक कार्यात नियमित सहभाग.राष्ट्रीय प्रशिक्षक, मास्टर रिसोर्स पर्सन यशदा, उद्योजकता विकास मार्गदर्शक, ई.डी. फॅकल्टी एम.सी.ई.डी, मिटकॉन, व्याख्याता, लेखक, समीक्षक, वक्ता, म्हणून २५ वर्षा पासुन कार्यरत पुंडलिक जनाबाई एकनाथ गोसावी यांना याआधी सुद्धा अनेक पुरस्काराने अलंकृत करण्यात आले आहे.सर्व मित्र, परिवार, सहकारी, आई जनाबाई, बाबा एकनाथ गणूजी गोसावी व पत्नी अर्चना पुंडलिक गोसावी यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.सर्व स्तरावरून त्यांचे कौतुक अभिनंदन होत आहे.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यापीठात व्याख्यान

## कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर यांचे विशेष व्याख्यान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**



कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उद्या( दि.२७ फेब्रुवारी ) पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व विदर्भ साहित्य संघ, शाखा अमरावतीयांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश अवलगावकर यांचे 'मराठीचे भवितव्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३ वाजता विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात हे व्याख्यान संपन्न होईल. विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील. तसेच विदर्भ साहित्य संघ शाखा अमरावतीचे अध्यक्ष श्री. विलास मराठे यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहील.या विशेष व्याख्यानाचा लाभ सर्व भाषा व साहित्यप्रेमींनी घ्यावा आणि मायमराठीच्या या जागरात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे आणि मराठी विभागप्रमुख डॉ.मोना चिमोटे यांनी केले आहे.

# अचलपुरात पकडला देशी कट्टा

## जिवंत काडतूस जप्त : दुचाकी सोडून पळणाऱ्या युवकाला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अचलपूर**



जिवंत काडतूस व देशी कट्टा विक्री होत असल्याच्या माहितीवरून अचलपूर पोलिसांनी कारवाई करीत मुद्देमाल जप्त केला आणि एका युवकाला सोमवारी दुपारी अटक केली.

अचलपूर पोलिसांनी जुना एसटी स्टैंड येथे सापळा रचला. अक्षय ऊर्फ हिमांशू ब्रिजमोहन बरदेला (२७, रा. सुदर्शननगर, फर्मानपुरा) हा दुचाकीने तेथे आला होता. तथापि, पोलिसांना पाहून दुचाकी सोडून तेथून पळत सुटला. मागावर असलेल्या अचलपूर पोलिसांनीत्याला शिताफीने पकडले. अंगझडती घेतली असता, त्याच्याजवळ एक देशी कट्टा व एक जिवंत काडतूस आढळून आले. दुचाकीसह पोलिसांनी एकूण ४ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल त्याच्याकडून जप्त केला. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनात अचलपूरचे ठाणेदार गजानन मेहत्रे, पुरुषोत्तम बावणेर, श्रीकांत वाघ, नितीन कळमटे, मंगेश पाटील, प्यारेलाल जामूनकर यांनी पार पाडली.

# चिखलदऱ्याहून निघालेल्या चवदार स्ट्रॉबेरीचा परतवाडा, अमरावती ते नागपूर असा प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २६ अमरावती**



मेळघाटातील चिखलदरा परिसरातील शेतकरी आजवर संपूर्णपणे पारंपरिक पिके घेऊनच उदरनिर्वाह करीत असत. मात्र बदलत्या काळानुसार या शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरी पिकाची लागवड करण्यास सुरुवात केली. आता परिस्थिती अशी झाली आहे की, चिखलदरा या पर्यटन स्थळी येणारे देशभरातील नागरिक येथे स्ट्रॉबेरीचा आस्वाद आवर्जून घेत आहेत. चिखलदऱ्यात पिकवलेली स्ट्रॉबेरी नागपूरमार्गे राज्यासह देशभरातील इतर जिल्ह्यांमध्ये पोहोचू लागली आहे.

गेल्या काही वर्षांपासून चार ते पाच गावांतील शेतकरी स्ट्रॉबेरीची शेती करीत आहेत. अमरावती येथील श्री शिवाजी उद्यान विद्या महाविद्यालयाच्या वतीने चिखलदरा तालुक्यात २०१४-१५ मध्ये माती परीक्षण केल्यावर या मातीत स्ट्रॉबेरीचे उत्पादन होऊ शकते हे स्पष्ट झाले.चिलखदरा तालुक्यात पाच ते सहा गावांमध्ये सुमारे ५० शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर स्ट्रॉबेरी लागवडीसाठी प्रोत्साहित करणारा नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला. पहिल्याच वर्षी सर्वच शेतकऱ्यांना किमान दोन लाखांपर्यंत उत्पन्न झाले. यानंतर शेतकऱ्यांना स्वखर्चाने स्ट्रॉबेरी लागवड करायची होती. सुमारे २५ शेतकऱ्यांनी स्ट्रॉबेरीची लागवड केली. मोथा या गावात स्ट्रॉबेरीचे सर्वाधिक उत्पन्न झाले, अशी माहिती स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांनी दिली. स्थानिक बाजारपेठेत दोनशे ते अडीचशे रुपये प्रतिकिलो दराने स्ट्रॉबेरी विकली जाते. पर्यटक मोठ्या आवडीने ती चिखलदरा येथील स्टॉलवरून विकत घेतात. गेल्या आठ वर्षांपासून स्ट्रॉबेरीचे उत्पादन चिखलदरा तालुक्यामध्ये घेतले जाते. जादा उत्पादन झाल्यास चिखलदऱ्याहून निघालेल्या चवदार स्ट्रॉबेरीचा परतवाडा, अमरावती ते नागपूर असा प्रवास होतो.

स्ट्रॉबेरी हा एक उत्तम पर्याय शेतकऱ्यांसमोर असून आता अल्पभूधारक शेतकरी देखील हा प्रयोग करून पाहत आहेत. स्ट्रॉबेरी लागवडीचा एकरी खर्च ३ लाख रुपये येतो. लागवड केल्यापासून दोन महिन्यांमध्ये उत्पादनाला सुरवात होते. सध्या स्ट्रॉबेरीची तोडणी सुरु असून हा हंगाम मार्चपर्यंत कायम राहणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ आणि बेरोजगारांच्या हाताला कामही यामुळे मिळत आहे. दिवसाकाठी एका एकरातून ३० ते ४० किलो स्ट्रॉबेरीचे उत्पन्न निघत आहे. मोथा, मडकी आणि आलाडोह या गावातील स्ट्रॉबेरीची शेती ही पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. स्ट्रॉबेरी म्हटली की, लालबुंद, गोड आणि दिसायला छान, असे फळ खाण्याचा आणि त्याची प्रत्यक्ष शेती पाहण्याची हौस पर्यटक आवरू शकत नाही. विदर्भातील पर्यटकांसाठी ही एक वेगळीच पर्वणी ठरत आहे.

# महाराष्ट्र विधीमंडळ समित्यांची घोषणा आश्वासन समितीच्या अध्यक्षपदी आ. रवी राणा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा : भाजप विधीमंडळ मुख्य प्रतोदपदी आ. रणधीर सावरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र मंत्रिमंडळाची बैठक मुंबईत पार पडली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये महाराष्ट्र विधीमंडळाच्या सन २०२४-२०२५ या कार्यकाळासाठी विविध समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये आश्वासन समितीच्या अध्यक्षपदी बडनेराचे आ रवी राणा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



मुख्यमंत्र्यांसह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजपविधीमंडळ मुख्य प्रतोद रणधीर सावरकर यांच्या संमतीनं या समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली नवेनियुक्त सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सार्वजनिक उपक्रम समितीच्या अध्यक्ष पदी पुणे जिल्ह्यातील दौंड मतदारसंघातील भाजपचे नेते राहुल कुल यांची वर्णी लागली आहे. तर पंचायत राज समितीच्या अध्यक्ष पदी रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोषदानवे-पाटीलयांची वर्णी लागली आहे. तर आश्वासन समितीच्या अध्यक्ष पदावर रवी राणा यांची, तर अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्ष पदी नारायण कुचे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीकल्याण समितीवर राजेशपाडवी, तर महिला हक्क व कल्याण समितीवर मोनिका राजळेया अध्यक्ष राहणार आहे. इतर मागासवर्गीय कल्याण समितीवर किसन कथोरे, मराठी भाषा समिती पदावर अतुल भातखळकर, विशेष हक्क समितीवर राम कदम, धर्मादाय खाजगी रुग्णालय तपास समितीवर श्रीमती नमिता मुंदडा, आणि आमदार निवास व्यवस्था समितीच्या अध्यक्ष पदावर सचिन कल्याणशेट्टी हे अध्यक्ष म्हणून कारभार पाहणार आहे.

**सेनेकडे सहा, राकाला पाच समित्या**

भाजपच्या वाट्याला ११ समित्या, तर शिवसेनेच्या वाटेला ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाटेला ५ समित्यांच्या सदस्यांची नियुक्ती होणार असल्याची माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी कांग्रेसकडून अद्यापही विधिमंडळ समितींबाबत घोषणा झालेली नाहीय. तर दोन्ही पक्षांकडून समितींबाबत घोषणा कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विधीमंडळाच्या एकूण २९ समित्या असतात, त्यातील महायुतीच्या फॉर्म्युल्या-नुसार भाजपच्या वाटेला ११ समित्या आल्याची सूत्रांची माहिती आहे.


# चोरट्यांनी आधी एटीएम मधले पैसे चोरले त्यानंतर मशीन ही जाळून टाकली

## सीसीटीव्ही कॅमेरावरही मारले स्प्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ तिवसा**

तिवसा शहरात स्टेट बँकेचे एटीएम फोडण्याची ही वर्षभरातली दुसरी घटना आहे.यापूर्वी जानेवारी २४ मध्ये म्हणजेच एक वर्षांपूर्वी सुद्धा एटीएम फोडण्यात आले होते.मात्र घटनेला एक वर्ष पूर्ण होत नाही तोच आज एटीएम फोडून रक्कम पळविल्यानंतर एटीएम मशीन चोरट्यांनी जाळून टाकली आहे





अमरावती जिल्ह्यातील तिवसा शहरातील स्टेट बँकेचे एटीएम फोडले नाही तर चक्क मशीन जाळून लाखो रुपये पळविल्याची खळबळजनक घटना घडली आहे. आज पहाटे चार वाजताचे सुमारास ही घटना घडली आहे.या घटनेचा शोध लागू नये म्हणून चोरट्यांनी आजूबाजूला असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरावर स्प्रे मारून पुरावा देखील नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे,

अमरावती-नागपूर हायवे वर तिवसा शहर असून अगदी रोडच्या कडेला भारतीय स्टेट बँक आहे.या बँकेचे येथे एटीएम असून या एटीएमच्या आजूबाजूला सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असतानाही अज्ञात चोरट्यांनी बुधवारी पावणेचार वाजता कॅमेरावर स्प्रे मारून सदर एटीएम मशीन फोडली.त्यात कुठलाच पुरावा पोलिसांच्या हाती लागू नये म्हणून एटीएम मशीन फोडल्यानंतर अनोखी शक्कल लढवून ती पूर्णतः जाळून टाकली.मात्र त्यापूर्वी लाखोंची मोठी रक्कम चोरट्यांनी पळवून नेल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. मंगळवारच्या मध्यरात्री नंतर आज बुधवारी पहाटे ३ वाजून ४३ मिनिटांनी ही घटना घडली आहे. घटनेनंतर आरोपींनी पळ काढला असून काही ग्राहक पैसे काढण्यासाठी एटीएम कडे गेल्यानंतर सदर एटीएम जाळून खाक केल्याची घटना उघडकीस आली.घटनेची माहिती तिवसा पोलिसांना मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली व याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात माहिती दिली असता स्थानिक गुन्हे शाखेच्या तीन पथकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.पुढील तपास सुरू आहे.

# वरुड बसस्थानकामध्ये अडीच क्विंटलच्या साबुदाणा खिचडी चे वाटप

## विभाग नियंत्रक व कामगार अधिकारी यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६वरुड**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा महाशिवरात्री निमित्य वरुड बसस्थानकावर अडीच क्विंटल उसळाचे वाटप करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहण अमरावती विभागाचे विभाग नियंत्रक निलेशकुमार बेलसरे यांच्या सह कामगार अधिकारी विजय गोडे , आगार व्यवस्थापक आशिष तागडे हे उपस्थित होते प्रवासी बांधव व शिवभक्तांनी मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी आगारातील सर्वच अधिकारी कर्मचाऱ्यांनी तसेच स्वयमेवकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता अथक परीश्रम घेतले. तर सर्व बसस्थानक परिसर बंबम भोले , शिवशंकरांच्या जयकाराच्या घोषणेने बसस्थानक परीसर दुमदुमुन गेला होता.



# महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर मा.खासदार नवनित रवि राणा यांच्या शिवमंदिरांना भेटी

## साबुदाणा खिचडीचे वाटपही केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

संपूर्ण भारतासह संपूर्ण जगामध्ये देवाचे देव महादेव भगवान शकराची महाशिवरात्री मोठया उत्साहात भाविक भक्त श्रध्देने साजरी करीत असतात. त्या अनुषंगाने अमरावती जिल्हयाच्या माजी खासदार नवनित रवि राणा यांनी सुध्दा अमरावती शहर व ग्रामीण मधिल ज्या ज्या ठिकाणी भगवान शंकराचे मंदिर आहे. त्या ठिकाणी जावुन भगवान शंकराचे दर्शन घेतले तसेच मंदिरामधिल असलेल्या शंकराच्या पिंडीवर अभिषेक करुन महाआरती केली. व सर्व सामान्य शेतकरी, शेतमजुर यांच्या सुख, समृध्दी साठी प्रार्थना केली.





नवनीत राणा यांनी आज गडगडेश्वर, महादेव खोरी, कोंडेश्वर, तपोनेश्ववर, जुनीवस्ती बडनेरा, नवीवस्ती बडनेरा, वलगांव, विशेश्वर मंदिर रेवसा इत्यादी ठिकाणी भाविक भक्तांना खिचडीचे वाटप सुध्दा केले. तसेच महादेव खोरी येथील आ.रवि राणा यांच्या निधीतुन ५० लक्ष रुपयांच्या शिव मंदिराच्या भव्य प्रवेशव्दाराचे व रस्त्याचे लोकार्पण सुध्दा केले.

यावेळी समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया, संजय तिरथकर, विनोद गुहे, पवन केशरवानी, पवन जाजोदिया, नितीन बोरेकर, आशिष गावंडे, पराग चिमोटे, नाना सावरकर, गणेशदास गायकवाड, बडु डकरे, निलेश भेंडे, अनुप खडसे, रवि अडोकार, सुनिल दिवान, विशाल परचाके, त्रिदेव ढेंडवाल, धनश्री भेंडे, पुजा बोरेकर, आकाश मोहोड, शुभम पाटने, रोहित मेश्राम, अंकुश पाटे, जटा भाई, सुनिल निचत, किरण अंबाडकार, जगदिश अंबाडकार, विजय पोकडे,गोलु देशमुख, प्रविण मोखळे, अविनाश काळे, तुषार दुधे, शुभम उबंरकर, राज मिश्रा, निता खडसे, सुनिता राऊत, सुनिता कोळमकर, शोभा जाधव, कोमल वैद्य, वैशाली वैद्य, अजय बोबडे, आशा सुरजुसे,सागर काकु, शिवानी जाधव व असंख्य भाविक भक्तगण उपस्थित होते.

# विदर्भ पटवारी अचलपूर उपविभाग शाखेचे एसडीओंना निवेदन

## गौण खनिज भरारी पथकावरील हल्लेखोरांवर कारवाई करा : आवश्यक सुरक्षा देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अचलपूर**

अचलपूर उपविभागात अवैध गौण खनिज उत्खननाच्या विरोधात कारवाई करणाऱ्या महसूल विभागाच्या भरारी पथकावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ, विदर्भ पटवारी संघाच्या अचलपूर उपविभाग शाखेने उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात, चांदूबाजार तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी विश्वजीत बंगरे आणि मंडळ अधिकारी राजेश व्यवहारे यांच्यावर रेती तस्करांनी टिप्पर चालवून जीवघेणा हल्ला केल्याची घटना निदर्शनास आणून देण्यात आली आहे.

हल्लेखोरांवर कठोर कारवाईची मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. तसेच, घटनास्थळी उपस्थित असलेल्या टिप्पर मालक पिंटू नवाब उर्फ शहबाज खान यांच्यावर अद्याप कोणतीही गुन्हेगारी कारवाई न झाल्याने, त्यांच्या विरोधात तात्काळ कारवाईची मागणी



करण्यात आली आहे. महसूल विभागाच्या भरारी पथकांना आवश्यक सुरक्षा प्रदान करण्याची आणि पळून गेलेल्या टिप्पर चालक व मालकावर कठोर कारवाई करण्याची मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.या प्रसंगी, मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. अवैध गौण खनिज उत्खननाच्या विरोधात कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले अत्यंत गंभीर असून, प्रशासनाने तात्काळ आणि कठोर पावले उचलून अशा घटना रोखाव्यात, अशी मागणी विदर्भ पटवारी संघाच्या अचलपूर उपविभाग शाखेने केली आहे.


# ड्राय झोन क्षेत्रात होतेय वाढ; पाच तालुक्यातील भूजल पातळीत झाली मोठी घट

## शेतीसाठी उपसा वाढला बोअरची संख्याही वाढतेय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

शेती व घरगुती कामासाठी मोठ्या प्रमाणात भूजल साठ्याचा उपयोग केला जात असल्याने दिवसेंदिवस पाणीपातळी घटत चालली आहे. जिल्ह्यात मागील तीन वर्षात सरासरीपेक्षा जास्त पडला आहे. परिणामी जिल्ह्याच्या पाणी पातळीत ०.८० मीटरने वाढ झाली आहे. एकीकडे सकारात्मक चित्र असले तरी दुसरीकडे मात्र जिल्ह्यात ड्रायझोन क्षेत्र वाढत चालले आहे. यामुळे भविष्याच्या दृष्टिकोनातून ड्रायझोन क्षेत्र असलेल्या पट्ट्यात प्राधान्याने भूजलाचे पुनर्भरण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

याशिवाय जलयुक्त शिवारसारख्या योजनामधून पाणी पातळी खोलवर गेलेल्या ठिकाणी जलसंधारणाची कामे, तसेच धरणातील गाळ काढणे, नवीन बंधारे बांधणे यासारखी कामे केल्यास याचा बराच फायदा भूजल वाढीसाठी होऊ शकतो. यासाठी लोकसहभाग तेवढाच महत्त्वाचा आहे. मागील काही महिन्यातील जिल्ह्यातील भूजलाची स्थिती लक्षात घेता चिखलदरा, चांदुर रेल्वे, धामणगांव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, मोर्शी या पाच तालुक्यातील पाणीपातळी कमी आहे. तर भातकुली तालुक्याची पाणी पातळी स्थिर आहे. अमरावती, अचलपूर, चांदुर बाजार, अंजगाव सुर्जी, दर्यापूर, वरुड या तालुक्यात पाणीपातळीत वाढ झाल्याची



**कुठल्या तालुक्याची पाणीपातळी किती?**

| तालुका | पाणीपातळी |
|---|---|
| अचलपूर | ३.५१ |
| अमरावती | ०.१६ |
| अंजनगाव सुर्जी | १.०२ |
| भातकुली | ०.५९ |
| चांदुर रेल्वे | ०.२४ |
| चांदुर बाजार | ४.२३ |
| चिखलदरा | ०.०१ |
| दर्यापूर | १.०८ |
| धामणगांव रेल्वे | ०.१७ |
| धारणी | ०.०५ |
| मोर्शी | ०.२३ |
| नांदगाव खंडेश्वर | ०.११ |
| तिवसा | ०.२१ |
| वरूड | १.०६ |

गत ऑक्टोबर महिन्यातील आकडेवारीवरून दिसून येते. विशेष म्हणजे जिल्ह्यात मागील तीन वर्षात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडल्याने जिल्ह्याच्या पाणी पातळीत ०.९० मिटरने वाढ झाली आहे.

काही वर्षात ड्रायझोनचे क्षेत्र वाढल्याने पाणी पातळी खोल गेल्याचा निष्कर्ष जीएचडीएने काढला आहे. यामध्ये चांदुर रेल्वे, चिखलदरा, धामणगांव, मोर्शी, नांदगाव या तालुक्यांचा समावेश आहे.

जिल्ह्यात मागील तीन वर्षांत सरासरीपेक्षा चांगला पाऊस पडला आहे. त्यामुळे अचलपूर, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी, अमरावती या तालुक्यांतील पाणी पातळी बऱ्यापैकी वाढली आहे.

मागील तीन वर्षात जिल्ह्यात पाणी पातळीत ०.८० मीटरने वाढ झाली असली तरी १४ पैकी पाच तालुक्यातील पाणी पातळी खोलवर गेली आहे. त्यामुळे जमिनीतील पाण्याचा उपसा अधिक होत आहे. त्यामुळे ड्रायझोन क्षेत्रासह अन्य तालुक्यात जलसंधारणावर भर देण्यासाठी लोकसहभाग वाढविणे आवश्यक आहे. पाणी पातळीत वाढ करण्यासाठी पाणी जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाच्या माध्यमातून उपाययोजना केल्या तर निश्चित पाणीपातळीत वाढ होऊ शकते.

महाराष्ट्र भूजल अधिनियम २००९ नुसार एसडीओंना प्राधिकृत केले आहे. सार्वजनिक पिण्याच्या व्यवस्थेसाठी विहीर, बोअरसाठी एसडीओकडे प्रस्ताव देऊन याला मंजुरी दिली जाते.